**सदर साक्ष नोंदवितांना आरोपी न्यायालयासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर.**

**नियमित फौजदारी ख. क्र. ४०४/२०२५.**
**निशाणी क्र. ०७/क**
**सरकार वि. सुकदेव तडवी**
**घटनास्थळ पंच.**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.०२.**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | जयकुमार रमेश जैन |
| वय | : | ४२ वर्षे, |
| धंदा | : | नोकरी |
| राहणार | : | शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे. |

**सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडूनः**

१. दि. ०१.०१.२०२५ रोजी पोलीसांनी मला शकुंतला लॉन्स जवळ बोलाविले होते. आशिष जैन यांची गाडी गेलेली होती. पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा केला. घटनास्थळाच्या चतुसिमा खालीलप्रमाणे –

पूर्वेस – शकुंतला लॉन्स
पश्चिमेस – पक्का रस्ता
दक्षिणेस – दवाखाना
उत्तरेस – रस्ता

२. मी पंचनाम्यावर सही केली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. तो तोच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. **घटनास्थळ पंचनाम्यास** हिस **निशाणी क्र. पी–१/पीडब्लु–२** देण्यात येत आहे. पंचनाम्याची नेमकी वेळ माझ्या लक्षात नाही. माझे सोबत दुसरे पंच म्हणून नुतन जैन हे होते. पोलीस सोनवणे हे पंचनामा करण्यासाठी आले होते. घटनास्थळ मला आशिषने दाखवले.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांच्यामार्फतः**

३. मी आधी टोलनाक्यावर नोकरीस होतो. सध्या घरी आहे. सन २०२५ मध्ये मी टोल नाक्यावर नोकरीस नव्हतो. दिनांक ०१.०१.२०२५ रोजी मी घरी होतो. तेव्हा पोलीसांनी मला बोलाविले. तेव्हा मला पोलीसांचा फोन आला होता. त्यावेळी मी पित्रेश्वर कॉलनी येथे राहण्यास होतो. मला नेमक्या किती वाजता फोन आला हे लक्षात नाही. अंदाजे २.०० ते ३.०० वाजता मला फोन आला होता. कोणत्या नंबरवरुन कोणत्या नंबरला फोन आला हेही मला सांगता येणार नाही.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.01.02 16:46:33 +0530

४.	हे म्हणणे खरे आहे की, आशिष भाऊ हे माझ्या जवळचे असून आम्ही एकाच समाजाचे आहोत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना मदत व्हावी म्हणून मी त्याजागी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ज्या कागदावर सही करुन मागत होते त्या कागदावर सही करुन दया असे मला आशिष भाऊ म्हणाले.

प्रश्न – आशिष भाऊ च्या सांगण्यावरुन तुम्ही सही केली ?

उत्तर– पंचनामा झाल्यावर मी सही केली.

५.	गाडीचा चेसीस नंबर, इंजीन क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामधील माहीती पोलीसांनी त्यांच्या मनाने लिहिली. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, त्यांनी गाडीचे कागदपत्रे पाहिल्यावरच पंचनाम्यावर मजकूर लिहिला असेल. मी गाडीचा चेसीस नंबर व इंजीन क्रमांक त्यांना सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आशिषच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.01.02 16:46:27 +0530

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**

शिरपूर.
दिनांक ०२.०१.२०२६.